# ग्रामीण कृषी मौसम सेवा

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 08-10-2024**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये कामठी ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-10-08 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2024-10-09 | 2024-10-10 | 2024-10-11 | 2024-10-12 | 2024-10-13 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.5 | 9.4 | 1.1 | 0.1 | 0.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 33.7 | 31.6 | 32.6 | 32.7 | 30.3 |
| किमान तापमान (अं.से) | 25.1 | 23.9 | 24.5 | 23.5 | 22.6 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 80 | 81 | 79 | 72 | 70 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 49 | 57 | 54 | 50 | 55 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 3 | 4 | 5 | 6 | 6 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 60 | 23 | 23 | 113 | 23 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 7 | 6 | 7 | 5 | 6 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या तालुकानिहाय मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक ०९ ते १३ ऑक्टोबर २०२४ दरम्यान आकाश आंशिक ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक ०९, १०, ११, १२ आणि १३ ऑक्टोबर २०२४ रोजी खूप हलक्या ते हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता, • दिनांक ०९ ऑक्टोबर २०२४ रोजी तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

सामान्य सल्ला: • हवामान अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील सोयाबीन, उडीद, मुग, तसेच इतर पिकाची कापणी झाली असल्यास शेतमाल कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवावा. शेतमाल प्लास्टिक शीट किंवा ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावा. मळणी ची कामे लवकरात उरकून घ्यावी. सोयाबीन कापणी शक्यतो सकाळच्या वेळी करण्यास प्राधान्य द्यावे. मजुरा अभावी कापणी शक्य नसल्यास हार्वेस्टर च्या सहाय्याने कापणीस प्राधान्य द्यावे. • शेतकरी बांधवांनी कीड आणि रोगाचा प्रादुर्भाव जाणण्यासाठी पिकाचे नियमित निरीक्षण करावे तसेच शिफारशीनुसार पिक नियंत्रणाच्या उपाययोजनाचा अवलंब करावा. • मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज वर्तविलेल्या दिवशी गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या व इतरपाळीव जनावरे मोकळ्या जागेत चरावयास सोडण्याचे टाळावे. जनावरे हे खुल्या पाण्याचे स्त्रोत, नदी किंवा तलाव वट्रॅक्टर व इतर धातूच्या अवजारांपासून दूर ठेवावे. जनावरांना गोठ्यामध्ये पुरेश्या चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी. झाडाखाली आश्रय घेणे कटाक्षाने टाळावे तसेच पशुधनाचा सुद्धा झाडाखाली आश्रय टाळावा.

## संक्षिप्त संदेश सल्ला:

• शेतकरी व शेतमजूर बांधवांनी विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज लक्षात घेता स्वतः ची तसेच पशुधनाची काळजी घ्यावी.

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| सोयाबीन | • ९० % शेंगा पिवळ्या झाल्यानंतर पिकाची काढणी करावी. बियाण्याच्या उगवण क्षमतेवर पावसाचा परिणाम होऊ नये यासाठी शेड मध्ये किंवा सूर्यप्रकाशात ताबडतोब वाळवावे. • काढणी केलेले पीक उन्हात वाळल्यानंतर मळणी करावी. मळणी ताबडतोब न केल्यास पावसापासून संरक्षण करून सुरक्षित ठिकाणी साठवून करावी. • पुढील हंगामात बियाणासाठी सोयाबीन चा वापर करावयाचा असल्यास, बियाणे उगवणाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी ३५० ते ४०० आरपीएम या वेगावर थ्रेशरने सोयाबीनची मळणी करावी. |
| कपाशी | • कपाशी पिकामध्ये पाते, फुले आणि बोंडे लागण्याच्या अवस्थेत मागील आठवड्यातील उच्च आर्द्रता, ढगाळ हवामान आणि सततच्या पावसामुळे आंतरिक बोंड सड या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आल्यास, व्यवस्थापनासाठी विकसित अवस्थेतील बोन्डाना चिकटलेल्या वाळलेल्या पाकळ्या गोळा करून शेताबाहेर नष्ट कराव्या. नत्रयुक्त खतांचा अतिरिक्त वापर टाळावा. कापूस पिकाच्या अतिरिक्त वनस्पती वाढीस प्रतिबंध करा. पिक क्षेत्रात पाणी साचू नये म्हणून शेतात पाण्याचा निचरा योग्य प्रकारे करावा. या रोगास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्ल्यूपी २५ ग्राम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने बोंडे विकसित होण्याच्या सुरुवातीच्या फवारणी करावी. शिफारस केलेल्या कीटकनाशकांच्या फवारणीने रस शोषक किडीचे व्यवस्थापन करावे. • मागील आठवड्यातील उच्च आर्द्रता, ढगाळ हवामान आणि सततच्या पावसामुळे कपाशीच्या पिकावर टार्गेट लीफ स्पॉट, अल्टरनेरिया पानावरील ठिपके, मायरोथेसिम पानावरील ठिपके, बाह्य बुरशीजन्य बोंड सड या व्यवस्थापनासाठी रोगप्रतिबंधक फवारणी घेण्याचा सल्ला दिला जातो. प्रोपिनेब ७० डब्ल्यूपी २५-३० ग्राम किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्लू/डब्ल्यू एससी १० मिली किंवा फ्लूक्सापायरोक्सॅड १६७ g/l + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ g/l एससी ६ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी २० ग्राम किंवा प्रोपीकोनाझोल २५ ईसी १० मिली किंवा पायराक्लोस्ट्रोबिन ५ % + मेटीराम ५५ % डब्ल्यूजी २० ग्राम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • कपाशीतील मूळ कुज, मर व जिवाणूजन्य पानावरील करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी ट्रायकोडर्मा प्र. (ट्रायकोडर्मा हर्झियानम किंवा ट्रायकोडर्मा व्हीरीडी) १ % डब्ल्यूपी ५० ग्राम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी २० ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून प्रादुर्भाव ग्रस्त व नजीकच्या प्रादुर्भाव ग्रस्त झाडांना आळवणी करावी. |
| कपाशी | • कपाशी मध्ये फुलोरा अवस्थेत २ टक्के युरिया ची आणि बोंडे विकसित होण्याच्या अवस्थेत २ टक्के डीएपी ची फवारणी करावी. • कपाशीमधील नैसर्गिक पाते व फुलगळ टाळण्यासाठी एनएए ४.५ एसएल ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कपाशीमधील अतिरिक्त कायिक वाढीस प्रतिबंध करण्यासाठी मेपीक्वेट क्लोराईड १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. • कपाशी पिकामध्ये फुलकिडे किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास थायमीथोक्झाम २५ % डब्ल्यूजी २ ग्राम प्रती १० लिटर पाणी (१००ग्राम प्रती हेक्टर) किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ८.४ मिली प्रती १० लिटर पाणी (४२० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. • ज्या ठिकाणी कपाशीचे पिक ६० ते ९० दिवसांचे आहे अशा ठिकाणी तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास, फ्लॉनिकॅमिड ५० डब्ल्यूजी @ ४ ग्राम प्रती १० लिटर पाणी (२०० ग्राम प्रती हेक्टर)किंवा डिनोटेफुरान २० एसजी ३ ग्राम प्रती १० लिटर पाणी (१५० ग्राम प्रती हेक्टर) किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल ३ मिली प्रती १० लिटर पाणी (१५० मिली प्रती हेक्टर) या पैकी कोणत्याही एका किटकनाशकाची फवारणी स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. • पांढऱ्या माशीचा पिल्ले अवस्थेतील प्रादुर्भाव आढळून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास पायरीप्रॉक्सीफेन १० ईसी २० मिली प्रती १० लिटर पाणी (१००० मिली प्रती हेक्टर) किंवा बुप्रोफेझिन २५ एससी २० मिली प्रती १० लिटर पाणी (१००० मिली प्रती हेक्टर) किंवास्पायरोमेसिफेन २२.९ एससी १२ मिली प्रती १० लिटर पाणी (६०० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात स्वच्छ व शांत हवामान असताना फवारणी करावी. • पांढऱ्या माशीचा पतंग अवस्थेतील प्रादुर्भाव आढळून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास डायफेन्थियुरॉन ५० % डब्ल्यूपी १२ ग्राम प्रती १० लिटर पाणी (६०० ग्राम प्रती हेक्टर) किंवा ॲफिडोपायरोपेन ५० g/L २० मिली प्रती १० लिटर पाणी (१००० मिली प्रती हेक्टर) किंवा डायनोटेफुरान २० एसजी ३ ग्राम प्रती १० लिटर पाणी (१५० ग्राम प्रती हेक्टर) किंवा फ्लॉनिकॅमिड ५० डब्ल्यूजी ४ ग्राम प्रती १० लिटर पाणी (२०० ग्राम प्रती हेक्टर) किंवा क्लोथीआनिडीन ५० डब्ल्यूडीजी १ मिली प्रती १० लिटर पाणी (५० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात स्वच्छ व शांत हवामान असताना फवारणी स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. |
| भात | • पिकाच्या गर्भावस्थेनंतर दाणेदार किटकनाशकाचा वापर करु नये. • पाने गुंडाळणारी अळी:- नंत्र खतांचा संतुलित वापर करावा. अळीने गुंडाळलेली नुकसानकारक पाने अळीसह गोळा करून नष्ट करावी. बिव्हेरीया बॅसियाना या जैविक बुरशीचा १.१५ % @२.२५ किलो/हे किंवा अझाडिरेक्टीन ०.१५ % @ ३०-५० मि.ली. किंवा क्वीनॉलफॉस २०% एफ @२५ मि.ली. किंवा इंडोक्साकार्ब १५.८ % @ ४.० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • तुडतुडे :- धान पिकावर तुडतुडे यांचा प्रादुर्भाव |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | होण्याची शक्यता आहे तरी त्यांच्या नियंत्रणासाठी मेटारायझियम अनिसोप्ली या जैविक बुरशीचा १.१५ % @ २.५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर या प्रमाणात बांधीमध्ये वापर करावा. तुडतुड्यांची आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडताच नियंत्रणासाठी बुप्रोफेजीन २५ % प्रवाही @१६ मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रीड १७.८ एस. एल. @२.० मि.ली. किंवा फिप्रोनिल ५ एस.सी. @ २० मि.ली. किंवा फ्लोनीकॅमीड ५० डब्लु.जी. @ ३.० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • खोडकिडीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी २० या प्रमाणे कामगंध सापळे लावावे. ट्रायकोग्रामा जापोनिकम (ट्रायकोकार्ड) हे परोपजीवी किटक हेक्टरी ५०,००० अंडी या प्रमाणात दर ७ दिवसाच्या अंतराने ३ ते ४ वेळा सोडावे. शेतात १० % किडग्रस्त फुटवे दिसताच क्लोरॅनट्रानीलीप्रोल ०.४ % दाणेदार @ १० कि.ग्रॅ. किंवा कारटॅप हायड्रोक्लोराईड ४ जी @ १८ कि.ग्रॅ. किंवा फीप्रोनिल ०.३ जी @ २५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर बांधीमध्ये पाणी असतांना टाकावे किंवा क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ % एस.सी. @ ३ मिली. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • गादमाशी:- कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार @ २५ किलो ग्रॅम प्रती हेक्टरी बांधीमध्ये ७ ते १० सेमी. पाणी, असतांना वापरावे. बांधीमधील पाणी ४ ते ५ दिवस बांधीबाहेर काढू नये. • रोग व्यवस्थापन: • करपा:- हेक्झाकोनॅझोल ५ % ई.सी. @ २० मि.ली. किंवा मेंकोझेब ७५% प्रवाही @ ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • कडाकरपा:- कॉपर हायड्रॉक्साईड ५३.८ % टक्के डी एफ @ ३० ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन @ १.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • आभासमय काजळी:- धान पिकाच्या ५०% फुलोऱ्याच्या वेळेस कॉपर हायड्रास्काईड ७७ % डब्लू.पी. ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून दुपारनंतर फवारणी करावी. • पाणी व्यवस्थापन: • धान लावणीनंतर रोपाची मुळे चांगली रुजेपर्यंत बांधीत पाण्याची पातळी २.५ से.मी. (एक इंच) ठेवावी. यानंतर दाणा पक्व होईपर्यंत ही पातळी साधारणतः ५ सें.मी. (दोन इंच) पर्यंत वाढवावी. • धान पिकात पीक निसवण्यापूर्वी १० दिवस व पीक निसवल्यानंतर १० दिवस पाण्याची पातळी १० सें.मी. (चार इंच) ठेवावी. पीक फुलोरा अवस्थेत असताना पाण्याचा ताण पडू देऊ नये. |
| कपाशी | • गुलाबी बोंड अळीच्या निरीक्षणासाठी पेरणीनंतर ४५ दिवसांनी कामगंध सापळ्याचा वापर करावा. पतंगांच्या निरीक्षणासाठी प्रती हेक्टर ५ कामगंध सापळे उभारावे. • फुलांमध्ये गुलाबी बोंड अळीच्या प्रादुर्भाव निरीक्षणासाठी पाते आणि फुले लागण्याच्या अवस्थेत निरीक्षण करावे. प्रादुर्भाव ग्रस्त डोमकळ्या काढून शेताबाहेर नष्ट कराव्या. • कपाशीचे पिक ६० दिवसांपेक्षा कमी असलेल्या ठिकाणी, ५ % निंबोळी अर्क + ५ मिली निम तेल प्रती लिटर पाणी, किंवा कडुनिंब तेलावर आधारित फॉर्म्युलेशन ५ मिली प्रती लिटर (३००किंवा १५०० पीपीएम) + 1.0 ग्राम धुण्याचा सोडा (प्रारंभिक १ ते २ फवारण्या) फवारणी करावी. निंबोळी अर्क २५ लिटर + निम तेल २.५ लिटर + ०.५ किली धुण्याचा सोडा यांचे मिश्रण प्रती हेक्टर या प्रमाणात वापरावे. फवारणी साठी प्रती एकर १५० ते २०० लिटर पाणी किंवा ३७५ ते ५०० लिटर पाणी प्रती हेक्टर या प्रमाणात वापरावे. • कपाशी मध्ये बोंडे लागण्याच्या अवस्थेत गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव व नुकसानीचे निरीक्षण करण्यासाठी यादृच्छिक पद्धतीने प्रती झाड एक बोंड या प्रमाणे २० बोंडे तोडून त्याचे निरीक्षण करावे. गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळी [१० टक्के पेक्षा जास्त प्रादुर्भाव ग्रस्त डोमकळ्या किंवा १० टक्के पेक्षा जास्त प्रादुर्भाव ग्रस्त बोंडे] (२० बोंडापैकी किमान २ बोंडामध्ये पांढरी किंवा गुलाबी अळी किंवा अळी बाहेर पडण्याचे छिद्र असल्यास) गाठत असल्यास किंवा सतत ३ दिवसामध्ये ८ पतंग प्रती कामगंध सापळ्यामध्ये आढळून आल्यास प्रोफेनोफोस ५० ईसी३० मिली प्रती १० लिटर पाणी (१५०० मिली प्रती हेक्टर) किंवा ईमॅमेक्टिन बेंझोएट ५ एसजी ५ ग्राम प्रती १० लिटर पाणी (२५० ग्राम प्रती हेक्टर) किंवाइंडोक्साकार्ब १४.५ एससी १० मिली प्रती १० लिटर पाणी (५०० मिली प्रती हेक्टर) किंवा क्लोरपायरीफॉस २० % ईसी २५ मिली प्रती १० लिटर पाणी (१२५० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात मिसळून फवारणी स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| संत्रा | • फळमाशी- फळमाशीच्या नरांना आकर्षित करण्याकरिता फळमाशी सापळे (मिथिल यूजोनौल) प्रती हेक्टरी २५ या प्रमाणात तोडणीच्या साधारण २ महिने आधीपासून बागेत झाडांवर टांगून ठेवावेत. बागेतील खाली पडलेली फळे वेचून नष्ट करून बाग स्वछ ठेवावी. फळमाशीची कोषावस्था जमिनीत २ ते ३ सेंटिमीटर खोलीपर्यंत असते. झाडाखालील माती हलवून किंवा निंदून घ्यावी. • फळातील रस शोषण करणारा पतंग- संत्रा रस शोषक पतंग किडीसाठी संत्रा पिकाच्या व्यतिरिक्त असलेल्या यजमान तणाचा नाश करावा उदा. गुळवेल, वासनवेल, चांदवेल इ. यजमान तणावर या किडीची अळी अवस्था राहते. साधारणतः सायंकाळीच्या वेळी (७ ते रात्री ११) या कालावधी मध्ये बागेच्या बांधावर गवत पेटवून धूर करावा. फळ पक्वतेच्या वेळी बागेच्या चार हि कोपऱ्यामध्ये तसेच मध्यभागी एक मर्क्युरी प्रकाशाचे दिवे लावावेत आणि दिव्यांच्याखाली पसरट भांड्यामध्ये केरोसीन ओतून ठेवावे. रसशोषण करणाऱ्या पतंगाकरिता विषारी आमिषे तयार करुन बागेत ठेवावी. या करीता मॅलॅथिऑन ५० ईसी २० मिली + |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | २०० ग्रॅम गुळ + खाली पडलेल्या फळांचा रस ( ४०० ते ५०० मिलि ) २ लिटर पाण्यात मिसळून प्रत्येकी दोन आमिषे रुंद तोंडाच्या दोन बाटल्यात टाकून प्रत्येक २५ ते ३० झाडांमध्ये एक या प्रमाणात ठेवावे. फळ हिरव्या रंगामधून पिवळसर रंगामध्ये रुपांतर होत असताना १०-१५ दिवसाच्या अंतराने फळ तोडणी होईपर्यंत निंबोळी तेल (निम ऑईल) किवा मिनरल ओईल १० मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. बागेतील खाली पडलेली फळे वेचून खड्ड्यात पुरून बाग स्वछ ठेवावी. • (नोंद: • लेबल क्लेम शिफारस नाही; संशोधनावर आधारित आहे, # केंदीय कीटकनाशक मंडळ, नवी दिल्ली शिफारस) (स्त्रोत: एआयसीआरपी ऑन फ्रुट, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला). |
| संत्रा | • कोलेटोट्रीकम स्टेम एंड रॉट किंवा देठ सुकणे - कोलेटोट्रीकम स्टेम एंड रॉट मुळे होणाऱ्या फळगळसाठी बोर्डेक्स ०.६ टक्के मिश्रणाची किवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी * २.५ ग्रॅम प्रति लिटर किंवा अझोक्सस्ट्रोबिन + डायफेनकोणाझोल १ मिलि प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. • ग्रेसी स्पॉट- खाली पडलेल्या पानांचा खच यांचे विघटन जलद गतीने होण्याकरिता कडीकचरा विघटन करणाऱ्या ईतर उपयोगी बुरशींचा (शेणखता सह मिश्रित बायो-डिकंपोझर (१ किलो / झाड) वापर करावा. साधारणतः झायनेब* (२० ग्रॅम / १० लि. पाणी) किवा होर्टीकल्चरल मिनरल ऑइल @ २% (२०० मिलि / १० लिटर पाणी) किवा पूर्व मिश्रित बुरशीनाशक हेक्साकोनाझोल ४% + झायनेब ६८ % डब्लुपी @ १५ ग्रॅम / १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मिनरल ऑइल किवा बुरशींनाशकांचा वापर केल्याने पानामध्ये बीजाणूंचा प्रवेश कमी होतो तसेच बीजाणूंची उगवण कमी होते. बुरशींचा संसर्ग झाला असल्यास लक्षणांच्या विकासास प्रतिबंध किंवा विलंब होतो त्याच बरोबर तेलकट चट्टे यांची तीव्रता कमी दिसून येते. • ब्राऊन रॉट (फळावरील तपकिरी कूज) - सर्वप्रथम झाडांवर गळून पडलेल्या पानांची व फळांची विल्हेवाट लावावी ती शेतात तसीच राहू देऊ नये अन्यथा या रोगाची तीव्रता वाढण्यास मदत होऊन संक्रमण जलद गतीने होते. वाफा स्वच्छ ठेवावा. फळबागेत फळांचे ढीग कुठेही ठेवू नका कारण ते रोगाचे प्रसार करण्याचे कार्य करतात. फायटोफ्थोरा बुरशीमुळे होणाऱ्या पानगळ व फळावरील तपकिरी कुज चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण झाडावर फासिटील ए.एल.* २.५ ग्रॅम किवां कॉपर ऑक्सीक्लोराईड * ५० डब्लूपी ३ ग्रॅम प्रती लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. फवारणी करतांना झाडाच्या परिघातामध्ये सुद्धा फवारणी करावी जेणेकरून खाली पडलेली फळे उचललेली नसल्यास त्यावरील बुरशीचा नायनाट होईल तसेच जमिनीमधील सक्रीय बीजाणू यांचा नायनाट होण्यासाठी मदत होईल. चांगले परिणाम मिळण्यासाठी या औषधामद्धे इतर कोणतेही तत्सम बुरशीनाशके/ कीटकनाशके/ विद्राव्य खते मिसळू नये. फायटोफ्थोरा बुरशीचा मुळांवर प्रादुर्भाव असल्यास सायमोक्सणील ८% + मंकोजेब ६४ % डब्लूपी* (मिश्र घटक असलेले) बुरशीनाशक २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून या मिश्रणात जवस तेल २.५ मिलि मिसळून असे द्रावण वाफ्यात मिसळावे किवा मेटलक्सील एम ३.३% + क्लोरोथायलोनील ३३.१% एससी* (मिश्र घटक असलेले बुरशीनाशक २० मिली १० लिटर पाण्यात मिसळून द्रावण वाफ्यात टाकावे. • (नोंद: • लेबल क्लेम शिफारस नाही; संशोधनावर आधारित आहे, # केंदीय कीटकनाशक मंडळ, नवी दिल्ली शिफारस) (स्त्रोत: एआयसीआरपी ऑन फ्रुट, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला) |
| टोमॅटो | • सततच्या पावसामुळे टमाटे पिकावर लवकर येणारा करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व आर्थिक नुकसान पातळी ओलांडत असल्यास स्वच्छ व शांत हवामान परिस्थिती असताना अझोक्सीस्ट्रोबिन २३ % एससी ५०० मिली प्रती हेक्टर किंवा पायराक्लोस्ट्रोबिन २० % डब्ल्यूजी ३७५ ते ५०० ग्राम प्रती हेक्टर प्रती ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मिरची | • तापमानातील चढ उतार व उच्च आद्रतेमुळे मिरची पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी हेक्साकोनाझोल ७५ % डब्ल्यूजी ६६.७ ग्राम ग्रॅम किंवा टेब्युकोनाझोल २५ % डब्ल्यूजी @ ५००-७५० ग्रॅम किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन ८.३ % + मॅन्कोझेब ६६.७ % डब्ल्यूजी @ १५०० ग्रॅम किंवा बोस्कालीड २५.२ % + पायराक्लोस्ट्रोबिन १२.८ % डब्ल्यूजी @ ६०० ग्राम किंवा कार्बेन्डाझिम १२ % + मॅन्कोझेब ६३ % डब्ल्यूजी @ ७५० ग्रॅम किंवा क्रेसॉक्सिम - मिथाइल १५ % + क्लोरोथॅलोनिल ५६ % डब्ल्यूजी @ १००० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल १० % डब्ल्यूपी + सल्फर ६५ % डब्ल्यूजी @ १२५० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल ५० % + ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन २५ % डब्ल्यूजी @ २५० ग्राम प्रती हेक्टर ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून या पैकी कोणत्याही एका बुरशी नाशकाची स्वच्छ हवामन परिस्थिती असताना फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • पूर्ण वाढ झालेल्या दुभत्या जनावरास दिवसाला २४ ते २५ किलो हिरवा चारा व ५ ते ६ किलो कोरडा चारा द्यावा, समतोल आहाराच्या दृष्टीने एकदल व द्विदल चाऱ्याचे प्रमाण अर्धे अर्धे असावे. जनावराच्या |

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| | आहारात १२ ते १३ किलो एक दल चारा, जसे कि, बाजरी, मका, ओट, नेपिअर इत्यादी तर द्विदल वर्गीय चारा जसे कि, लसून घास,चवळी इत्यादी चा समावेश करावा. • गोठयातील जमीन कोरडी ठेवावी व स्वच्छता राखावी. • बुरशी लागू नये यासाठी जनवारांचे खाद्य व चारा सुरक्षित साठवावा. • जनावरांच्या गोठयाचा सभोवतालील परिसर स्वच्छ व निरोगी ठेवावा आणि गोठ्याभोवती असलेली अनावश्यक झाडे झुडुपे काढून टाकावीत. • नवीन हिरवा चारा जास्त प्रमाणात खाण्यास जनावरांना प्रतिबंध करावा. |